# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)६९९६५५५५** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

जा. क्र./मरासुम/प्रशासन/३३७३/२०२३ दि. २०/११/२०२३.

**विषय :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची ३ वाहने विक्री करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नावे असलेलेली ३ चार चाकी वाहने विक्री करावयाची आहेत. वाहनांची अधिक माहिती जाहिराती मध्ये नमुद करण्यात आली आहे. इच्छूक खरेदीदारकांनी वाहनाची योग्य ती माहिती घेऊन, दरपत्रक तयार करावे; त्यासोबत जाहिराती मध्ये नमुद आवश्यक कागदपत्र जोडून सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील नमुद पत्यावर दि. २०/११/२०२३ ते दि. ३०/११/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत पाठवावीत. नमुद शेवटच्या दिनांका नंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

वाहनांच्या अधिक माहिती करीता www.maharashtra.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहिल.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

**जाहिरात**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची ३ वाहने विक्री करणेबाबत.**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**
**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.**
**ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

## १) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शासकीय/निमशासकीय/संवेदनशील/खाजगी व्यावसायिक आस्थापनांना सुरक्षारक्षकां मार्फत सशस्त्र सुरक्षा व संरक्षण पुरविले जात आहे.

महामंडळाच्या नावे असलेली खालील मॉडेलची वाहने विक्री करावयाची असून, त्यासाठी इच्छूक खरेदीदारांकडून निविदा मागविण्यासाठी सदरची जाहिरात देण्यात येत आहे.

## २) एकूण - ३ वाहनांचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | विविध ३ मोटार वाहनांचा तपशील | | |
|---|---|---|---|
| | Vehicle No :- MH-01-ZA-3000 | Vehicle No :- MH-01-AN-0278 | Vehicle No :- MH-01-AN-0277 |
| 1 | Model :- Honda city | Model :- Tata Indigo | Model :- Mahindra Bolero |
| 2 | Engine No. :- L15A71217152 | Engine No.:- 14CRIL08HXYW28384 | Engine No.:- GRC4M48799 |
| 3 | Chassis No. :- MAKGM252GAN105200 | Chassis No. :- MAT601443CPJ56678 | Chassis No. :- MA1PL2GRKD2A51035 |
| 4 | Class :- - | Class :- LMV | Class :- LMV |
| 5 | MFG CD :- - | MFG CD :- TML | MFG CD :- M & M |
| 6 | Product Year (Vehicle purchase year) :- 2010 | Product Year (Vehicle purchase year) :- 2013 | Product Year (Vehicle purchase year) :- 2013 |
| 7 | आत्तापर्यंत वाहन चालविलेले Kilo Meters :- १७५९६१ | आत्तापर्यंत वाहन चालविलेले Kilo Meters :- १२२०९४ | आत्तापर्यंत वाहन चालविलेले Kilo Meters :- २१७४१० |
| 8 | अपेक्षीत किंमत :- ११००००/- | अपेक्षीत किंमत ८४०००/- | अपेक्षीत किंमत १४००००/- |
| 9 | वाहन स्थिती :-चालू स्थितीत आहे. | वाहन स्थिती :- बंद स्थितीत आहे. | वाहन स्थिती :- बंद स्थितीत आहे. |

## ३) महत्तवाच्या सूचना :-

कृपया, वरील ३ मॉडेलची वाहने खरेदी करणेकरीता; निविदा सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. उपरोक्त पाच वाहनांची अपेक्षीत किंमत (हातची किंमत) तथा Upset Price वरील तक्त्यात अ. क्र. ८ मध्ये दर्शाविण्यात आलेली असून, सदरची किंमत आधारभूत असून, त्यापेक्षा अधिक किंमतीच्या खरेदीदारकांपैकी सर्वोच्च किंमत असलेली खरेदीदारकांची निवड करण्यात येईल. अपेक्षीत किंमती पेक्षा कमी दराच्या निविदा बाद ठरविण्यात येतील.

२. उपरोक्त वाहने 'आहे त्या स्थितीत' विक्री करण्यात येणार आहेत, याची खरेदीदारकांनी नोंद घ्यावी.

३. वाहन खरेदी करू इच्छीत खरेदीदारांनी निविदा सादर करण्यापुर्वी रु. १०,०००/- इतकी रक्कम इसारा म्हणून (Earnest Money Deposit) महामंडळाच्या खालील बँक खात्यात जमा करावी.

**Office Name – Maharashtra State Security Corporation,**
**Bank Name – State Bank of India**
**Bank Account No. - 41437874207**
**IFS Code - SBIN0000300**

४. इसाऱ्याची रक्कम मरासुम कार्यालयाच्या बँकेच्या खाती जमा केल्याची पावती दरपत्रका सोबत जोडणे अनिवार्य आहे. पावती सोबत नसल्यास त्यांचे दरपत्रक (बाद) रद्द करण्यात येईल.

५. खरेदीधारकाची निवड प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत जमा केलेल्या सर्व खरेदीदारांची इसाऱ्याची रक्कम मरासुम कार्यालयात जमा राहील. खरेदीदाराची निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यावर निवड करण्यात आलेल्या खरेदीदारकाची इसाऱ्याची रक्कम समायोजित करण्यात येईल. व उर्वरीत रक्कमेचा भरणा करावा लागेल. तर, इतर खरेदीदारकांची इसाऱ्याची रक्कम त्यांना परत करण्यात येईल.

६. निविदा सादर करणे करीता कार्यालयाद्वारे नमुना तयार करण्यात आला असून, तो जाहिरातीच्या शेवटी प्रसिध्द् करण्यात आला आहे. सदरच्या नमुन्यातच आपले दर नमुद करून निविदा सादर करावे.

७. निविदे मध्ये कोठेही खाडाखोड/ओव्हररायटिंग/पांढरीशाही लावणे टाळावे, तसे केल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

८. वाहनाची पहाणी तपासणी करणेकरीता तसेच वाहनाची अधिक माहिती मिळविणेकरीता कार्यालयाच्या खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत ९.४५ AM ते ६.१५ PM मध्ये प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

९. अंतीम दिनांका नंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

१०. खरेदीदाराने निविदा सिलबंद लिफाफ्यात खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत. पोस्टाने कुरीअरद्वारे निविदा पाठविण्यात येत असल्यास नमुद दिनांका पुर्वी मरासुम कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच ई-मेल अथवा वॉट्अप याद्वारे निविदा पाठवू नयेत.

११. खरेदीधारकास निवड करण्यात आल्याबाबत कळविण्यात आल्यानंतर इसाऱ्याची रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम भरून एक आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे अत्यावश्यक राहील. अन्यथा दरपत्रक रद्दबातल ठरविली जाईल, तसेच इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. निविदा सादर करताना त्यामध्ये नमुद केलेली बोली रक्कम GST सह आहे कि GST शिवाय आहे; याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. बोली रक्कम GST शिवाय असल्यास निविदे मध्ये नमुद केलेल्या रक्कमेवर वस्तू व सेवाकर अधिनियमानुसार आवश्यक तो वस्तू व सेवाकर (GST कर) भरावा लागेल.

१३. वाहनांच्या हस्तांतरण नोंदणी (Registration) व आवशक टॅक्स याबाबत सर्व प्रक्रिया निवड करण्यात आलेल्या खरेदीदारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१४. निवड केलेल्या खरेदीदारकांस वाहन खरेदीच्या अटी व शर्तीसह निविदा मंजूरीचे पत्र ई-मेल तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.

**४) <u>निविदाकारांनी सादर करावयाची कागदपत्र :-</u>**

१) (EMD) इसाऱ्याची रक्कम भरणा केलेल्या पावतीची छायांकीत प्रत.
२) खरेदीदाराचे दोन फोटो.
३) ओळखीचा पुरावा पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ.यापैकी कोणतेही एक
४) कंपनी/फर्मच्या नावे वाहने खरेदी करावयाचे असल्यास त्याचे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**५) <u>निविदा पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-</u>**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५

**६) <u>महत्तवाच्या दिनांक व वेळ :-</u>**

१. दरपत्रके सादर करण्याची पहिली दिनांक - दि. २०/११/२०२३ वेळ सकाळी ९.४५ पासून सुरु
२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक - दि. ३०/११/२०२३ व वेळ १८.०० वाजेपर्यंत.
३. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक - दि. ०१/१२/२०२३ व वेळ ११.०० वाजता.

**सदर निवड प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

प्रति,
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

**विषय :- मरासुम कार्यालयाची वाहन खरेदी करणेबाबत.**

| **अ. क्र.** | **तपशील** | |
|---|---|---|
| **१** | खरेदीदारकाचे नाव / कंपनी असल्यास कंपनीचे नाव | |
| **२** | खरेदीदारकाचा पुर्ण पत्ता | |
| **३** | खरेदीदारक कंपनी असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| **४** | (EMD) इसाऱ्याची रक्कम भरल्याची पावती क्रमांक व दिनांक | |
| **५** | जाहिराती नुसार वाहन पाहणी केल्याचा दिनांक | |

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात जा. क्र./मरासुम/प्रशासन/ /२०२३, दि. / /२०२३ अन्वये सदरची निविदा सादर करीत आहे/आहोत. जाहिराती मध्ये नमुद अटी, शर्ती, नुसार खालील नमुद केलेले वाहन त्यासमोर नमुद केलेल्या किंमतीस जसे आहे; त्या स्थितीत (As is where is basis) या तत्तवावर खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणी (Registration) करीता होणारा सर्व खर्च मी/आम्ही स्वखर्चाने करणार आहे./आहोत.

१. वाहन क्र. ---------------------------------------------- किंमत रु. ------------------------------------

२. वाहन क्र. ---------------------------------------------- किंमत रु. ------------------------------------

३. वाहन क्र. ---------------------------------------------- किंमत रु. ------------------------------------

जाहिराती मधील नमुद सर्व सुचना, अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

आपला विश्वासू

नाव व निविदाधारकाची सही
संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक

**टीप :-** कंपनीच्या वतीने वाहन खरेदी करणार असल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक प्रामुख्याने नमूद करावा.